# जिल्हा शिवसेना 'शव' सेना होण्याच्या मार्गावर?

## शिंदे सेनेनंतर आज काही शिवसैनिकांचा भाजप मध्ये होणार प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.19)**- विधानसभा निवडणूकीच्या पराभवानंतर उबाठा शिवसेनेत भविष्य दिसत नसलेले पदाधिकारी व कार्यकर्ते 'चालत्या गाडीत' म्हणजेच सत्ताधारी पक्षात प्रवेश करित आहेत. बुधवारी(दि.18) उबाठा शिवसेनेचे जिल्हा अध्यक्ष श्याम देशमुखांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला.






आता काही शिवसैनिक शुक्रवारी (दि.19) भाजपमध्ये प्रवेश करण्याची तयारी करत असल्याने जिल्हा शिवसेना 'शव' सेना होते की, काय अशी भीती काही शिवसैनिकांना लागली आहे.

राज्य विधानसभा निवडणूकीत महायुतीला घवघवीत यश मिळाल्यानंतर महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा शिवसेना पक्षातील पदाधिकाऱ्यांमध्ये अस्थिरतेचे वातावरण पहायला मिळत आहे. अश्यातच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तोंडावर असल्याने उबाठा सेनेतील अनेक शिवसैनिकांनी शिंदे सेनेत प्रवेश केला आहे. नागपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात देवगिरी बंगला येथे प्रवेश समारोह पार पडला.

जिल्हाध्यक्ष श्याम देशमुखसह अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. बुधवारी (दि.18) यांनी नागपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या पदाधिकाऱ्यांनी पक्षप्रवेश केला. आता आगामी महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर शिवसेनेकडून नगरसेवक झालेले महिला, पुरुष पदाधिकारी माजी आमदार प्रविण पोटे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. त्यामूळे शिवसेनेची गळती कधी थांबणार असा प्रश्न शिवसैनिकांना पडला आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने बोलवुन देणार आदेश

## आमदारांसह उपमुख्यमंत्र्यांनी घेतली लाडक्या बहीनीच्या तक्रारीची दखल

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.19)**- राज्य शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करून 1500 रुपये अनुदान देणे सुरू केले. मात्र अनेक बँक हे अनुदान थेट लाभार्थी महिलांना न देता त्यांच्या कर्जातून कपात करीत असल्याची तक्रार वरुड शहरातील निर्मला नारायणराव चरपे नामक महिलेने थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री व आमदारांकडे केल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने दखल घेत अमरावती जिल्हाधिकारी यांना बोलवुन थेट कार्यवाहीचे आदेश देणार असल्याचे माध्यमांशी बोलतांना सांगीतले.



राज्य शासनाकडून मिळत असलेले लाडकी बहिण योजनेचे अनुदान युनियन बँक शाखा वरुड यांनी त्या महिलेच्या कर्ज खात्यात जमा करीत राज्य शासनाच्या परिपत्रकाला थेट केराची टोपली दाखविली. शहरातील निर्मला नारायणराव चरपे या महिलेच्या बँक खात्यात 5 महिन्याचे अनुदान जमा झाले. मात्र युनियन बँक शाखा व्यवस्थापकाने ते अनुदान थेट कर्ज खात्यात वळते करीत अनुदान जमाच झाले नाही. तुमच्या खात्यात शुन्य रक्कम असल्याचे सांगत त्या महिलेची गेल्या 5 महिन्यांपासुन दिशाभुल केली. या संदर्भात त्या महिलेने तक्रार केल्याने तहसीलदार व माध्यमांच्या प्रतिनिधींनी बँक व्यवस्थापकांशी चर्चा केली असता त्या व्यवस्थापकाने उडवाउडविची उत्तरे देत राज्यशासनाच्या परिपत्रकाला केराची टोपली दाखविली. नंतर वरुड तालुक्यातील पत्रकारांनी हिवाळी अधिवेशनात थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व कॅबिनेटमंत्री, राज्यमंत्री व सत्ताधारी आमदारांसह विरोधी गटातील सर्वच आमदारांना त्या महिलेल्या निवेदनासह पुरावे सादर करीन प्रश्न उपस्थित केल्याने, या महिलेच्या निवेदनाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अमरावतीचे जिल्हाधिकारी यांना बोलवून थेट कार्यवाहीचे आदेश दिले. निर्मला नारायणराव चरपे मोलमजुरी करुन आपला उदरर्निवाह करते. महाराष्ट्र राज्य शासनाने सुरु केलेल्या लाडकी बहिण योजने अंतर्गत त्या महिलेला गेल्या 5 महिण्याचे 3 टप्पात 7500 रुपये तिच्या युनीयन बँक ऑफ इंडिया शाखा वरुड येथील खाते क्र.416002010124489 मध्ये जमा झाले होते. मात्र बँक प्रशासनाने तिचे जमा झालेले अनुदान कर्ज खात्यात वळते केल्याने तिला या योजनेचे पैसे मिळालेच नाही. राज्य शासनाने लाडकी बहिण योजने संदर्भात काढलेल्या परिपत्रकानुसार या योजनेचे पैसे कुठल्याच कर्ज खात्या मध्ये वळते न करता थेट लाभार्थी महिलांना देण्यासंदर्भात उल्लेख केलेला आहे. तरी मात्र युनियन बँक ऑफ इंडियाच्या वरुड शाखा व्यवस्थापक यांनी तिला मिळत असलेले अनुदान कर्ज खात्यात वळते करुन राज्य शासनाच्या परिपत्रकाला केराची टोपली दाखविली असुन राज्य शासनाच्या परिपत्रकाची थेट अवहेलना केल्याने या प्रकरणी राज्यशासन स्तरावरून नक्कीच कार्यवाहीचे संकेत दिल्याने याकडे महाराष्ट्रातील लाखो लाडक्या बहिनींचे लक्ष लागले आहे.

# ट्रकमधून गोवंशांची वाहतूक, 27 गायींना जीवदान

### लालखडी चौक मैदानातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.19)** - नागपुरीगेट पोलिसांनी गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतूक करणारा ट्रक पकडला. पोलिसांनी 27 गायींना जीवदान दिले. 19 डिसेंबर रोजी सहायक पोलिस निरीक्षक अनंता ठाकरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी ट्रकचालक व मालकावर गुन्हा दाखल केला आहे.



लालखडी चौकातील मैदानात दर्ग्याजवळ जनावरांनी भरलेला ट्रक उभा असल्याची गोपनीय माहिती नागपूरी गेट पोलिसांना मिळाली होती. या आधारे पोलिसांनी तातडीने धाड टाकली असता, घटनास्थळीवरील ट्रक क्रमांक एमएच 31/सीक्यू 0817 मधून काही जनावरे उतरवली जात होती. त्यावेळी पोलिसांना पाहून तेथे उपस्थित असलेले लोक पळून गेले. पोलिसांनी सर्व गायींना ट्रकमधून काढून गोरक्षणात पाठवले आहे. पोलिसांनी 1 लाख 25 हजार रुपये किमतीच्या 27 गायी आणि 10 लाख रुपये किमतीचे ट्रक असा एकूण 11 लाख 25 हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. पोलिसांनी ट्रक चालक व मालकावर गुन्हा दाखल केला आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

- गर्भवती होऊन बाळाला दिला जन्म
- प्रियकरावर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.19)** - अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून आरोपी प्रियकराने तिला गर्भवती केले. पिडित अल्पवयीन मुलीने एका मुलाला जन्म दिला. ही घटना लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी प्रियकरावर गुन्हा दाखल केला आहे.



लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 16 वर्षीय अल्पवयीन पीडितेला आरोपीने आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. त्यानंतर ती अल्पवयीन असतानाही त्याने तिच्याशी लग्न केले. दरम्यान, शारीरिक संबंधांमुळे अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली. बडनेरा येथील रुग्णालयात तिने एका बाळाला जन्म दिला. आई अल्पवयीन असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात येताच पोलिसांना ही माहिती देण्यात आली. अखेर पीडितेच्या तक्रारीवरून लोणी पोलिसांनी पतीविरुद्ध कलम 64, 64 (2), एमए 65 (1)अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.



# मुलीचा पाठलाग करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अमरावती**- लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारा आरोपी हा दररोज 18 वर्षीय मुलीचा पाठलाग करत होता. माझे तुझ्यावर प्रेम आहे आणि मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, असे फोनवर सांगून तो त्रास देत होता. तो ऑटोने पाठलागही करत असायचा. याला कंटाळून तरुणीने अखेर लोणी पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पाच दुचाकी जळून खाक

- एसपी कार्यालयामागील परिसरातील घटना
- आग लागली की लावली ?



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.19)** - पोलिस अधीक्षक कार्यालयामागील स्थानिक गुन्हे शाखेच्या परिसरातील पाच उभ्या दुचाकी आग लागल्याने जळून खाक झाल्या. 18 डिसेंबर रोजी रात्री 9 वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर खळबळ उडाली होती. अग्निशमन दोन गाड्यांमधील पाण्याचा मारा केल्यानंतर आग आटोक्यात आली. ही आग कशी लागली, ही बाब स्पष्ट झाली नाही. एसपी कार्यालयामागेच स्थानिक गुन्हे शाखेचे कार्यालय असून, या कार्यालयाच्या मागील बाजुला काही दुचाकी मोकळ्या जागेत उभ्या होत्या. रात्रीच्या 9 वाजताच्या सुमारास अचानक दुचाकींना आग लागल्याचे काही जणांना दिसले. त्यामुळे या घटनेची माहिती एसपी कार्यालयातील जयराम पळसकर यांनी अग्निशमन विभागाला दिली. या घटनेच्या माहितीवरून पाण्याचे दोन बंब घटनास्थळी पोहोचले. आगीवर पाण्याचा मारा करण्यात आला. त्यानंतर काही वेळात आग विझविण्यात आली.

# सिमेंटच्या दरात वाढ

## बांधकामाचे गणित कोलमडणार

### सिमेंट गोणीत 10 ते 15 रुपयांची वाढ

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि.19)**- अगोदरच महागाईने त्रस्त जनता आता सिमेंट दरात झालेल्या वाढीने चिंता वाढणार आहे. सिमेंट दरात वाढ झाल्याने बांधकाम क्षेत्रालाही आर्थिक झळ सोसावी लागणार. सिमेंटचे दर वाढल्याने बांधकाम व्यवसायावर काहीसा परिणाम होणार असून सर्वसामान्यांच्या खिशाला मात्र कात्री लागणार आहे.



पाच महिने सिमेंटच्या किमती स्थिर राहिल्यानंतर डिसेंबरमध्ये सिमेंटच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली. सध्या मजुरांची उपलब्धता वाढल्याने रिअल इस्टेट क्षेत्रात सिमेंटची मागणी वाढली आहे. तसेच मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्येही सिमेंटची मागणी कायम असल्याने या महिन्यात सिमेंटच्या किमतीत वाढ झाली. सिमेंट उद्योगातील बड्या कंपन्यांचे अधिग्रहण होऊन काही मोजक्याच कंपन्या शिल्लक राहिल्याने किमती वाढत राहतील, असा अंदाज बांधकाम क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.



सध्या 50 किलो सिमेंटच्या पोत्याच्या किमतींमध्ये 10 ते 15 रुपयांची वाढ झाली असून, सध्याच्या किमती 350 ते 400 रुपयां दरम्यान आहेत. तालुक्यात 300 ते 390 रुपये प्रमाणे प्रतिपोते गुणवत्तेप्रमाणे आणि कंपनीनुसार सिमेंटचा दर होता. यामध्ये आता 315 ते 320 रुपये म्हणजेच प्रति 50 किलो पोत्यांच्या किमतीत 15 ते 20 रुपये वाढ झाली आहे. स्टीलचे दर मात्र स्थिर असून स्टील 51 ते 52 रुपये किलो दराने विकले जात आहे. सिमेंट वाढल्याने बांधकाम व्यवसायावर काहीसा परिणाम होणार असून सर्वसामान्यांच्या खिशाला मात्र कात्री लागणार आहे. परतवाडा शहर अचलपुर तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. त्यांना अधिक दराने सिमेंट घ्यावे लागणार आहे. तेल, डाळी, भाजीपाला आदींमध्ये वाढ झाली असतानाच आता वाढलेल्या सिमेंट दरामुळे नव्याने बांधकाम करणार्यांप सर्वसामान्य जनतेला महागाईची झळ बसणार आहे.



### सरकारने सिमेंट दरात हस्तक्षेप करण्याची गरज

बांधकाम व्यवसाय हा अनेकांना रोजगार पुरवणारा व्यवसाय आहे. या व्यवसायावर अनेकांची गणिते अवलंबून असतात. त्यामुळे बांधकाम व्यवसायाने गती घेतली तर त्याचा अर्थकारणावर परिणाम होत असतो. परंतु, वाढीव किमतीमुळे हा व्यवसाय थंडावला तर बाजारपेठेवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे सरकारने दरामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# गृहमंत्री अमित शाह राजीनामा द्या!

### शहर काँग्रेसची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.19)** - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत केलेल्या भाषणादरम्यान संविधान निर्माते, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल काँग्रेस पक्षाद्वारे त्यांच्या या कृतीचा जाहीर निषेध केल्या जात आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे समस्त जनमानस आंदोलित झाले असून त्यांनी त्यांच्या या अपनास्पद वक्तव्याबाबत अद्यापही माफी मागितलेली नाही. गृहमंत्री अमित शहांचा निषेध करित शहर काँग्रेसने त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.



भारताच्या राज्यघटनेच्या निर्मात्याचा अपमान केल्यामुळे गृहमंत्री शाह यांच्या राजीनाम्याची आणि माफीची मागणी काँग्रेसने निवेदनातून केली आहे. आम्ही करीत आहोत. किंबहुना देशाच्या पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कृत्याबद्दल आपल्या मंत्रिमंडळातून तातडीने बरखास्त करण्यात यावे या मागणी करिता या काँग्रेसचे सर्व खासदार आणि इतर विरोधी सदस्यांनी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची छायाचित्रे घेऊन संसदेत %जय भीम% आणि %अमित शाह माफी मांगो% अशा घोषणा देण्यात आल्या. विविध राज्यांमध्ये काँग्रेस नेत्यांनी राजभवनाबाहेर निदर्शने केली. गृहमंत्री अमित शहा यांचे शब्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेचा अत्यंत अपमान करणारे आहेत.

म्हणुन देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा केलेला अपमान त्यावर त्वरित कडक कार्यवाही करून त्यांचा तातडीने राजीनामा घेऊन त्यांना मंत्रिमंडळातून बरखास्त करावे अशी मागणी मागणी अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. याप्रसंगी प्रामुख्याने अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर, माजी महापौर अशोक डोंगरे,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, मुन्ना राठोड,विनोद मोदी, सलीम मिरावाले, शोभा शिंदे,सलीम बेग, प्रा.बी.टी.अंभोरे, रवींद्र शिंदे, विजय खंडारे, अपर्णा मकेर्श्वर, विजय वाणखडे, विजय आठवले, दिलीप लोहांडे, किशोर रायबोलें, ?ड.प्रभाकर वानखडे, पंकज मेश्राम यांच्या सह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# महानुभव आश्रमचा शतकपुर्ती समारोह आजपासून

## सरसंघचालक, महाराष्ट्र व युपी चे मुख्यमंत्री राहणार उपस्थित





*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती,( दि.19 ) - स्थानिक कंवर नगर परिसरात असलेल्या महानुभाव आश्रमाला 20 नोव्हेंबर रोजी 100 वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे स्थानिक महानुभाव संप्रदायाच्या वतीने 20 ते 22 डिसेंबर या कालावधीत महानुभाव आश्रमाच्या शतकपूर्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या शतकपूर्ती महोत्सवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्यासह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हेही उपस्थित राहतील. याशिवाय राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही या महोत्सवाला आमंत्रित करण्यात आले आहे. याशिवाय, या कार्यक्रमादरम्यान, भव्य मिरवणूक, संन्यास दीक्षा आणि धर्मसभेचेही आयोजन करण्यात आले आहे.*

या संदर्भात माहिती देताना आयोजकांनी सांगितले की, या शतकपूर्ती महोत्सवाचे सुरुवात 20 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजता कंवर नगर परिसरातील महानुभाव आश्रमात ध्वजारोहण व रोट उपहार महोत्सवाने होणार आहे. त्यानंतर दुपारी 3 वाजता सायंस्कोर मैदानातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. घोडे व उंटांसह बँजो व बँडच्या तालावर ही मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक सायस्कोर मैदानापासून सुरू होऊन राजकमल, राजापेठ मार्गे कंवर नगर संकुलातील महानुभव आश्रमात पोहोचेल. त्यानंतर मिरवणुकीची सांगता होईल, त्यानंतर 21 आणि 22 डिसेंबर रोजी भानखेडा नजिक गोविंदपूर येथील महानुभाव आश्रमात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत 21 नोव्हेंबर रोजी सकाळी 9 ते 11 या वेळेत संन्यास दीक्षा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये 5 ते 7 महानुभवांना संन्यासाची दीक्षा दिली जाणार आहे. तसेच दुपारी 3 ते 5 या वेळेत आयोजित धर्मसभामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे व्याख्यान होणार आहे. यावेळी राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह जिल्ह्याचे खासदार, आमदार उपस्थित राहणार आहे. तसेच रात्री 9 वाजता महंत कळमकर बाबा गाडे जळगावकर यांचे कीर्तन होईल.

### कोण आहेत सध्याचे कारंजेकर बाबा



अमरावती जिल्ह्यातील एसुर्णा येथील पडोळे कुटुंबात जन्मलेल्या मोहन दादांना त्यांच्या कुटुंबीयांनी बालपणीच कंवर नगर येथील महानुभाव आश्रमात सुपूर्द केले होते. जिथे शिक्षण पूर्ण करून मोहन दादांनी संन्यास दीक्षा घेतली आणि महानुभाव आश्रमात कायमचे रुजू झाले. तसेच आज विनम्रता, पुढाकार आणि नेतृत्व या गुणांमुळे ते कंवर नगर परिसरात असलेल्या महानुभाव आश्रमात कारंजेकर सिंहासनावर विराजमान झाले. प्रथम मोहन पडोळे. तेव्हा मोहनदादा अमृत आणि आता कवीश्वर कुलाचार्य मोहनराजबाबा कारंजेकर या नावाने ओळखले जाणारे सध्याचे महंत मोहनराज बाबा यांचे समाजातील सर्व घटकांशी आणि राजकारण्यांशी जवळचे संबंध असून ज्ञान, भक्ती आणि त्यागाच्या पूर्ततेबरोबरच ते समर्पितही आहेत. धर्म जागृत करण्याचे काम करत आहे.



### 700 वर्षांपासूनची परंपरा

700 वर्षांपासून चालत आलेली करंजेकर परंपरा, महानुभाव आश्रमाचे तिसरे आचार्य कविश्वर व्यास म्हणजेच भास्कर भट बोरीकर हे करंजेकर परंपरेचे मूळ पुरुष असल्याचे म्हटले जाते. ज्यांच्या मुख्य शिष्यांमध्ये धाडी नागाईसा, परशुराम व्यास आणि रामेश्वर व्यास यांचा समावेश होता. यापैकी धाडी नागाईसाचा वंश विस्तार करंजेकर शाखा आहे. कविश्वर व्यास यांची शिष्य असण्याबरोबरच नागाईसा ही त्यांची भाची होती. त्यामुळे त्यांची ओळख धाडी नागाईसा अशीच राहिली. ज्यांना किश्वर कुलाचार्य पदाचा बहुमानही देण्यात आला होता. पुढे त्यांना नांदेडमध्ये मुनिव्यास देशपांडे नावाचा शिष्य मिळाला आणि त्यांची परंपरा पुढे त्यांच्या शिष्याने म्हणजेच कमलाकर ब्राह्मण (हकीम) यांनी पुढे चालू ठेवली, जो बिदरच्या राजाचा दिवाण होता. कमलाकर ब्राह्मण हे मूळचे कारंजाचे रहिवासी असून संन्यास दिक्षा घेतल्यानंतर त्यांना कमलाकर मुनी करंजेकर या नावाने ओळखले जाऊ लागले. तसेच त्यांच्याकडूनच 'श्री करंजेकर' हे नाव प्रचलित झाले आणि 'श्री कारंजेकर' हे नाव गेली 700 वर्षे प्रचलित आहे. ज्यांच्या शिकवणीमुळे आजवर अनेक आदरणीय आचार्य श्री कारंजेकर महापुरुष झाले आहेत. ज्याने भक्ती आणि जीवनाचा त्याग करून ईश्वरप्राप्तीचा अंतिम मार्ग दाखवला.

### सरसंघचालक येणार

कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी 22 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजता भानखेड येथील महानुभाव आश्रमात ध्वजारोहणाने धार्मिक कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. त्यानंतर सकाळी 10 वाजता सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, सार्थ सप्त काव्य या पुस्तकाचे प्रकाशन आणि शतकपूर्ती सोहळ्याच्या स्मरणिकेचे प्रकाशन होईल. याशिवाय यावेळी आयोजित धार्मिक सभेला सरसंघचालक मोहन भागवत यांचेही भाषण होणार आहे. यानंतर पंचावतार भेट व महाप्रसादाचे आयोजन करून या तीन दिवसीय शतकपूर्ती सोहळ्याची सांगता होणार आहे.



# अंजनगाव सुर्जी येथे रास्ता रोको

## 'अमित शहा मुर्दाबाद' च्या दिल्या घोषणा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.19 )** - अमित शहा मुर्दाबाद घोषणाबाजीने अंजनगाव सुर्जी येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात गुरुवारी(दि.19) रास्ता रोको करण्यात आला.

संसद भवनात देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल भाष्य केल्याने संपूर्ण भारतभर संतापाची लाट उसळली आहे. अमित शहा याच्या निषेधार्थ अंजनगाव सुर्जी येथे रास्ता रोको करण्यात आले. यावेळी अमित शहा मुर्दाबाद, तडीपार गृहमंत्री मुर्दाबाद, 'माफी मागो अमित शहा माफी मागो' घोषणाबाजी करण्यात आली. 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर रहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विजय असो' अशी नारे बाजी करण्यात आली. यावेळी सिध्दार्थ सावळे, रमेश सावळे, तेजस अभ्यंकर, पंकज वारुळे, रोशन इंगोले, सुनील राक्षसकर, सोमेश इंगळे, संघरतन सरदार, संजय रायबोले, अजय आठवले, रतन रायबोले, अंकुश इंगळे, साहेबराव सदाशिव, श्रीकृष्ण इंगळे, अशोक वानखडे, देवानंद थोरात, मंगल इंगळे,प्रकाश अभ्यंकर, रामदास अभ्यंकर, अरविंद तायडे,अनिल शिरोळे, चंदू रायबोले, आशिष खडे, गजानन गायगोले, मनोज शिरोळे, बाळासाहेब अभ्यंकर, ऋतिक रौराळे, कलिम शेख लुकमान शेख, विनोद तेलगोटे, समता सैनिक दलाचे कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा.बळवंत वानखडे यांनी घेतली रेल्वे मंत्र्यांची भेट



**अमरावती** - खासदार बळवंत वानखडे यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. यावेळी अमरावती लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्थानकांसह रेल्वे प्रवाशांसाठी वाढीव व आधुनिक सुविधा पुरविण्याची विनंती केली. यात प्रामुख्याने वंदे भारत ट्रेन बडनेरा जंक्शन ते मुंबई व पुणे या स्थानकांसाठी सुरू करावी, प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन अतिरिक्त रेल्वेची मागणी इत्यादींचा समावेश होता. यावेळी खासदार भागवत कराड , खासदार शिवाजीराव काळगे , खासदार कल्याणराव काळे उपस्थित होते.

## अलपवयीन मुलीचे अपहरण

**अमरावती**- चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी दत्तझिरीच्या अलमस्त बाबांच्या जत्रेला जात असल्याचे सांगून घरातून निघून गेली. तेथून अज्ञात आरोपींनी तिचे अपहरण केले. वडिलांच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# अंगणवाडी सेविकांना दिले ई रिक्षाचे प्रशिक्षण

## एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजनेअंतर्गत पुढाकार



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.19 )**- एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अंतर्गत ग्रामीण अंजनगाव सुर्जी तसेच महिला व बालकल्याण अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने पिंक (गुलाबी इ रिक्षा योजना राबविण्यासाठीयांचे एक दिवशीय प्रशिक्षण व प्रात्यक्षिक घेण्यात आले

या प्रशिक्षणाला प्रात्यक्षिकाला शरयु धुमाळे बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी उपस्थित असून.राज्यातील महिला व मुलींना रोजगार निर्मिती कशाप्रकारे चालना देणे त्यांचे आर्थिक सामाजिक पुनर्वसन करणे स्वावलंबी आत्मनिर्भर करणे सह शक्ती करण्यास चालण्या देण्यासाठी तसेच महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करणे यासाठी राज्यातील गरजू महिलांना रोजगारासाठी पिंक ( गुलाबी) ई रिक्षा या महाराष्ट्र शासनाच्या योजनेची माहिती दिली आणि जास्तीत जास्त गरजू महिलांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त करणे व शिबिराला महिला व बालकल्याण अमरावती विभागाकडून आशा मॅडम तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.सुधीर डोंगरे, नगरपरिषद शहर प्रकल्प अधिकारी सविता, नगरपरिषद समूह संघटिका ज्योती जावरे,

अंजनगाव नगरपरिषद सीआरपी, अंगणवाडी सेविका, ग्रामीण व शहरी भागातील महिला प्रामुख्याने उपस्थित होत्या. हा संपूर्ण कार्यक्रम प्रज्वल थेलकर (विस्तार अधिकारी) आयसीडीएस अंजनगाव सुर्जी यांनी सर्व उपस्थित महिलांचे आभार व्यक्त केले. काही अंगणवाडी सेविका यांनी ई रिक्षा चालवण्याचे प्रात्यक्षिक सुद्धा करून दाखविले जास्तीत जास्त गरजू महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा अशी सर्वांना आवाहन करण्यात आले.

# श्री विठोबा संस्थान च्या विश्वस्त पदी लक्ष्मण राठोड यांची निर्विरोध नियुक्ती



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे, ( दि.19 )** - संपूर्ण महाराष्टात कापुराची यात्रा म्हणुन ख्याती असलेले महाराष्टातच नव्हे तर राज्याबाहेरील ही भाविक गुढीपाडव्याच्या पर्वावर लाखों च्या संख्येने उपस्थिती दर्शवितात असे चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दि. 19 डिसेंबर 2024 गुरुवारला दुपारी 12.00 वाजता संस्थानची सामान्य सभा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. संस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त दिगांबर राठोड यांच्या राजीनाम्यामुळे विश्वस्त पद रिक्त झाले होते. त्यामुळे अवधूती सांप्रदायातील ख्यातनाम असे युवा व्यक्तिमत्व लक्ष्मण राठोड यांची संस्थानच्या समस्त पदाधिकारी व विश्वस्त यांच्या वतीने निर्विरोध नियुक्ती करण्यात आली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड,अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी उपस्थित होते.



# बेनोडा शहीद बसस्थानकावरील पथदिवे पुन्हा बंद?

## आंदोलन केल्यानंतर केवळ 15 ते 20 दिवसच सुरू होते पथदिवे



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.19 )** - तालुक्यातंर्गत येत असलेल्या बेनोडा शहीद येथील पथदिवे सुरू करण्यासाठी गावातील काही नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केलीत एरवी चक्काजाम आंदोलन सुद्धा करण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणाची दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने दखल घेऊन काही दिवसानंतर पथदिवे सुरू केले, परंतु ते पथदिवे 15 ते 20 दिवसच सुरू राहिले नंतर पुन्हा जैसे ती परिस्थिती झाली असल्याची खंत गावातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. वरुड ते अमरावती या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले बेनोडा शहीद हे गाव आहे या गावाला शहिदांचा मान प्राप्त आहे. या गावाला बेनोडा शहीद या नावाने ओळखल्या जाते. या गावातूनच वरुड ते अमरावती हा राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे. या राष्ट्रीय महामार्गावरील बस स्थानकांवर पथदिवे काही दिवस सुरू राहिल्यानंतर पुन्हा बंद करण्यात आलेले आहे. याविषयी गावातील काही नागरिकांनी अनेक आंदोलने केलीत. एरवी चक्काजाम आंदोलन सुद्धा करण्यात आले होते. याची दखल राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने घेतल्यानंतर केवळ 15 ते 20 दिवस पथदिवे सुरू करण्यात आल्यानंतर गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले होते. आता मात्र पुन्हा पथदिवे बंद अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे केवळ आंदोलनच केल्याने बेनोडा शहीद बसस्थानकावरील पथदिवे सुरू राहील का? असा प्रश्न बंद असलेल्या पथदिव्यामुळे निर्माण झाला आहे.

# गाडगेबाबांच्या पुतळ्याची जन्मभुमी शेडगावात दुर्दशा

## जन्मभुमी शेंडगाव विकास आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात • राज्यपालांची भेट शेड अभावी दुरावस्थेत





**प्रविण बोके**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.19 )** - गाडगेबाबांचे जन्मगाव शेंडगाव येथे गेल्या चार वर्षापासून सुरु असलेल्या शेंडगाव विकास आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात असले तरीही निधीअभावी अनेक कामे अर्धवट राहणार असल्याचे दिसत आहे. त्यामुळे शासनाने शेंडगावच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्याची मागणी होत आहे. तर तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव यांनी शेंडगावला गाडगे बाबांचा भेट दिलेल्या अर्धाकृती पुतळ्याची शेड अभावी दुरावस्था झाली असुन प्रशासनाने याकडे विशेष लक्ष देण्याची मागणी होत आहे.







गाडगेबाबांच्या जन्मगावाचा विकास आणि गाडगे बाबांचे विचार सर्व दुर पोहचावे यासाठी तत्कालीन राज्यपाल सी.विद्यासागर राव यांनी गाडगेबाबांचा अर्धाकृती पुतळा गाडगेबाबांचे जन्मगाव शेंडगावला भेट म्हणुन दिला होता. त्या अर्धाकृती पुतळ्याचे उद्घाटन करण्यासाठी विद्यमान मुख्यमंत्रींनी स्वत: शेंडगाव येथे येऊन जन्मभुमी शेंडगाव साठी 18 कोटी रुपयाच्या विकास आराखड्यास मंजूरात दिली होती. परंतू काही दिवसात सरकार बदलले आणि दोन वर्षानंतर जानेवारी 2021 ला विकास आराखड्याच्या कामाला सुरवात झाली. यामध्ये कोरोणा काळ आला आणि निधी अभावी काम थंडबस्त्यात पडले. मात्र आज जन्मभुमी विकास आराखड्याचे काम अंतीम टप्प्यात आले आहे. मात्र शेंडगाव विकास आराखड्यातील काही कामे निधी अभावी तशीच पडून राहणार अशी खंत गावकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मुख्यंमत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकडे विशेष लक्ष देऊन गाडगेबाबा जन्मभूमीला निधी प्राप्त करुण द्यावा अशी मागणी होत आहे.

### पाच वर्षांपासून पुतळा हालअपेष्टांमध्ये

कर्म योगी संत गाडगेबाबा यांनी समाजाचे प्रबोधन करण्याकरिता अनेक हाल अपेष्टा सहन केल्या. मात्र आता त्यांच्या पश्चात त्यांचा अर्धाकृती पुतळा पाच वर्षांपासून हालअपेष्टा सहन करित आहे. हा पुतळा उन, वारा, पाऊस सोसत आहे. प्रशासनाने त्यावर अतितत्काळ शेड उभारावा व त्या जागेचे सौंदर्यीकरण करावे, तसेच खुल्या जागेचे सौंदर्यीकरण, भूलेश्वरी नदीला अर्धवट असलेली संरक्षण भिंत पुर्ण करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करावा, तेथे सर्व सोयी युक्त खुला रंगमंच उभारावा, भूलेश्वरी नदीवर पुल व बंधारा बांधण्यात यावा, बांधकाम झालेल्या जागे व्यतिरिक्त खुल्या राहिलेल्या जागेचे सौंदर्यीकरण (बगीचा) करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### पुतळ्याची दुरुस्ती करु!

गाडगेबाबांच्या पुतळ्याची दुरावस्था होत असल्याचे उपविभागीय अभियंता हेमंत भोये यांच्या लक्षात आणुन दिले,.पुतळा ज्या साहित्याने बनवला आहे ते साहीत्य (मटेरियल) वेगळे असून आम्ही लवकरच खराब झालेल्या पुतळ्याची दुरस्ती करणार असे सांगितले. तसेच पुतळा हा विकास आराखड्या अगोदर असला तरीही आम्ही त्यावर लवकरच शेड उभारुन पुतळ्याचे सौदर्यीकरण करणार असल्याचे प्रतिनिधींशी बोलतांना त्यांनी सांगीतले.


## जन्म/मृत्यू बाबत जाहिरनामा

**नायब तहसीलदार महसुल अमरावती यांचे न्यायालय**
**रा.मा.क्र.एम.आर.सी- ६१/अमरावती/ ४२३३/२०२३-२०२४**

अर्जदार :- शितल प्रकाशराव साबळे
रा. चांदूर बाजार, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती

**विरूद्ध**

गैरअर्जदार :- निबंधक जन्म-मृत्यू, आरोग्य विभाग,
महानगरपालिका, अमरावती ता.जि. अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्यावर कायम1 रहीवसी आहे. अर्जदार शितल प्रकाशराव साबळे रा. चांदूर बाजार, ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचा जन्म दि. २२/१२/१९८५ अमरावती येथे झाला. निबंधक जन्म/मृत्यू अमरावती महानगरपालिका ता. जि. अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची/मृत्यूची नोंद महानगर पालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९ (३) नुसार जन्माच्या/मृत्यूच्या नोंदणीचा आदेश होणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, ज्या कोणास सदर नायब तहसीलदार अमरावती, येथील दाखल अर्जातील शितल प्रकाशराव साबळे यांचा जन्म/मृत्यू दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास ने.ता. १६/०१/२०२५ पर्यंत स्वत: किंवा आपल्या वकीलामार्फत येवून हरकत न घेतल्यास सदर्हू अर्जदार यांची किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.
दिनांक :- १६/१२/२०२४

कोर्ट शिक्का

**नायब तहसीलदार महसूल**
**अमरावती**